# ‘बीयूआयएलडी’मध्ये बिटस् पिलानीच्या विद्यार्थ्यांचे यश

**प्रतिनिधी, वास्को**

बोईंग युनिव्हर्सिटी इन्नोव्हेशन लिडरशिप डेव्हलपमेंट (बीयूआयएलडी) कार्यक्रमात सांकवाळ येथील बिटस् पिलानी के. के. बिर्ला गोवा कॅम्पसच्या विद्यार्थी संघाने विजेतेपद पटकावले.



सांकवाळ : बिल्ड कार्यक्रमातील पिनाका प्रकल्पातील विजेत्या बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या संघासमवेत प्रशिक्षक प्रा. शिबू क्लेमेंत.

बिटस् पिलानी गोवा कॅम्पसच्या ‘पिनाका’ प्रकल्पाच्या पथकाचे प्रशिक्षक मेकॅनिकल इंजिनीयरींग विभागाचे प्रा. शिबू क्लेमेंट यांच्या नेतृत्वाखालील संघात सक्षम अगरवाल, क्षितीज छाब्रा, हर्षवर्धन शिरोड्कर, देवांशु वाखले, श्रेयस एस., हर्षवर्धन चंद्रशेखर, भरत गुप्ता, पृथ्वी रमेश, शांभवी सिंग व देवांश गुप्ता यांचा समावेश होता. या संघाने सोलर एन्डुरन्स युएव्हीचा शोध लावला.

बिटस् पिलानीच्या संघानी चार महिन्यांपूर्वी बोईंग बिल्ड स्पर्धेत भाग घेतला होता. तेव्हापासून बॉईंगतर्फे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत होते. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेच्या पाच टप्प्यात प्राविण्य मिळविले. दोन फेरीत मुलाखती व दोन फेरीत विभागीय व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचा समावेश होता.